N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर शहर **P.S.(ठाणे):** सिडको

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0184 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 02/04/2026 17:55

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From (दिंनाक पासून):** 02/04/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 02/04/2026
   **Time From (वेळेपासून):** 11:39 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 02/04/2026 **Time (वेळ):** 17:46 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 037
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 02/04/2026 17:46 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** झोन क्रमांक-6, महानगरपालीका,बाजुस कनट प्लेस मागील बाजुस,छत्रपती संभाजीनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संगीता शंकर पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1973

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्र,विभाग छत्रपती संभाजीनगर ,सिडको , छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्र,विभाग छत्रपती संभाजीनगर ,सिडको , छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8766755515

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. रुपचंद धरमचंद बनकर | | | 1. मयुर पार्क, घर नं-26,वडाचे झाडाजवळ, सिध्दीधन सोसायट,छत्रपती संभाजीनगर , सिडको ,छत्रपती संभाजीनगर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिंयाद दि 02/04/2026.

मी संगीता शंकर पाटील, वय 53 वर्ष, व्यवसाय नोकरी, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मो.नं. 8766755515

मी सरकार तर्फे फिंयादी होवुन फिंयाद देतो की, मी वरील प्रमाणे असुन मागील तीन वर्षापासुन छत्रपती संभाजीनगर येथे पोलीस उप अधीक्षक, म्हणुन नेमणुकीस आहे. दिंनाक 01/04/2026 रोजी तक्रारदार आमचे कक्षात आले. आमचे कक्षात येवून त्यांच्याकडे होत असलेल्या लाच मागणी बाबत आम्हाला सांगीतले. आम्ही त्यांची तोंडी तक्रार ऐकुन घेतली. आम्ही तक्रारदार यांना तुम्ही तुमची लेखी तक्रार दोन शासकीय पंचासमक्ष द्या असे सांगुन दोन शासकीय पंचांची सेवा उपलब्ध करून घेतली व दोन शासकीय पंचा समक्ष तक्रारदार श्री.अजय राजधर जगदाळे, वय 42 वर्ष, व्यवसाय महाराष्ट्र युवा शक्ती श्रमीक कामगार संघटना अध्याक्ष, व शेती, रा- सावंगी हर्सूल, ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांची लेखी तक्रार त्यांच्या हस्ताक्षरात घेतली. तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, मी अजय राजधर जगदाळे, वय 42 वर्ष, व्यवसाय महाराष्ट्र युवा शक्ती श्रमीक कामगार संघटना अध्यक्ष, व शेती, रा- सावंगी हर्सूल, ता.जि.छत्रपती संभाजीनगर मो.नं. 9960766175

समक्ष लाचलुचपत प्रतिंबधक विभाग (ACB) छत्रपती संभाजीनगर येथे मा. पोलीस उप अधीक्षक, श्रीमती पाटील मॅडम यांचे समक्ष हजर येऊन माझ्याकडे होणाऱ्या लाच मागणी बाबत सांगीतले असता DYSP श्रीमती संगीता पाटील, मॅडम यांच्या समक्ष मी माझ्या हस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली की, माझी महाराष्ट्र युवा शक्ती श्रमीक कामगार संघटना असून मी सदर संघटचा अध्यक्ष आहे. मी संघटनेच्या वतीने महाराष्ट्र इमारत कामगार कल्याणकारी मंडळ, योजनेचा ऑनलाईन फॉर्म भरुन देणेकरीता मदत करतो. माझ्या संघटनेकडे 50 कामगार हे बांधकाम कामगार नोंदणी करणेकरीता आले आहे. सदर योजनेची ऑनलाईन नोंदणी करणेकरीता महानगरपालीका यांच्यामार्फत बांधकाम कामगारास मागील वर्षात 90 दिवस किंवा अधिक दिवस काम केल्याचे प्रमाणपत्राची आवश्यकता असते. त्यामुळे 50 बांधकाम कामगाराच्या वतीने मी महानगर पालीका, झोन क्रमांक 6, छत्रपती संभाजीनगर येथे कामगारास मागील वर्षात 90 दिवस किंवा अधिक दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र मिळविणेकरीता गेलो असता, महानगर पालीका झोन क्रमांक -6, छत्रपती संभाजीनगर येथील लोकसेवक श्री. बनकर हे माझ्याकडे 550/- (पाचशे पन्नास) रुपये प्रत्येकी प्रमाणपत्रकरीता असे एकुण 50 बांधकाम कामगार यांचे प्रमाणपत्र देणेसाठी 27500/- (सत्तावीस हजार पाचशे) रुपये मागणी केली आहे. परंतु माला त्यांना पैसे/लाच देण्याची इच्छा नाही. मी आज दिंनाक 01/04/2026 रोजी महानगर पालीका झोन क्रमांक-6, छत्रपती संभाजीनगर येथे लोकसेवक श्री. बनकर यांची भेट घेण्यासाठी जाणार आहे. त्यांनी मला माझ्याकडील बांधकाम कामगार यांचे कामगारास मागील वर्षात 90 दिवस किंवा अधिक दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र देणेकरीता लाचेची मागणी स्वत: अगर इतरामार्फत केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी. माझा व माझ्याकडे मागणी करीत असलेले लोकसेवक यांच्या सोबत पुर्वीचा कोणताही उसणवारी/पैशाचा व्यवहार नाही. अगर माझी त्यांच्यासोबत वैर अथवा भांडण नाही.

तरी माझ्या संघटनेकडे आलेले 50 बांधकाम कामगार यांचे वतीने वरीलप्रमाणे मी तक्रार देत आहे. मी माझी तक्रार माझ्या स्वहस्ताक्षरात स्वत: लिहली असुन ती बरोबर व खरी आहे. अशी लेखी तक्रार दिल्याने पंचांची खात्री झाल्यावर पंचांनी व आम्ही त्यावर सह्या केल्या.

त्यानंतर तक्रारदार श्री. अजय राजधर जगदाळे, पंच व सापळा पथकातील सदस्य हे आम्ही दिंनाक 01/04/2026 रोजी आमच्या कक्षात हजर आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिंनाक

01/04/2026 रोजी झोन क्रमांक - 6, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर येथे तक्रारदार यांना त्यांच्या कामासाठी अभि.कथित लोकसेवक श्री.बनकर हे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत तक्रारदार व पंच क्रमांक 1. श्री.शेख अतिक समी, यांना झोन क्रमांक -6, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय आम्ही, तक्रारदार, शासकीय पंच व सापळा पथक पो.ह. इंगळे, पो.अं बारसे, गोरे यांचे समक्ष घेतला. त्यानंतर आम्ही दोन शासकीय पंच,सापळा पथक, तक्रारदार असे स्वत:कडील खाजगी दुचाकी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथुन सुमारे 16.30 वाजता झोन क्रमांक -6, महानगरपालीक, छत्रपती साभाजीनगर जवळील सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी रवाना झालो. झोन-6, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर जवळील सुरक्षीत ठिकाणी पोहचल्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. अजय राजधर जगदाळे व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना देऊन व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. आमच्या सुचनेवरुन पो.अ बारसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये SanDisk कंपनीचे 16 जी. बी क्षमतेचे नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर तक्रारदार यांच्या गळयात सुरक्षीत अडकवून व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार श्री. अजय राजधर जगदाळे, पंच क्रमांक-1 श्री. शेख अतिक समी, यांना झोन क्रमांक-6, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर येथे अभि.कथित लोकसेवक श्री.बनकर यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांना जाणेकरीता 17.22 वाजता रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रमांक -1 श्री. शेख अतिक समी, हे 18.01 वाजेच्या सुमारास अभि.कथित लोकसेवक श्री. बनकर यांची भेट घेऊन आम्ही थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी परत आले. आमच्या सुचनेवरुन पो.अंमल. बारसे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन आमच्या ताब्यात दिले. त्यानंतर आम्ही, तक्रारदार, पंच व सापळा पथकातील सदस्याने व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले असता, तक्रारदार यांना अभि.कथित लोकसेवक श्री.बनकर हे झोन-6, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर भेट न झाल्याने तक्रारदार श्री. अजय जगदाळे, यांनी त्यांचे मोबाईल क्रमांक 9960766175 यावरुन अभि.कथित लोकसेवक बनकर यांचे 9284007919 या मोबाईल क्रमांकावर फोन केला असता त्यामध्ये तक्रारदार व अभिकथित लोकसेवक बनकर यांचेत झालेले संभाषण त्यात अभि.कथित लोकसेवक श्री. बनकर म्हणाले बोलाना, त्यावर तक्रारदार श्री. अजय जगदाळे, म्हणाले अरे ,कुठे आहे बनकर साहेब, त्यानंतर अभि.कथित लोकसेवक बनकर म्हणाले मी येथे होतो हार्सुल होतो, बोला, त्यावर तक्रारदार श्री. अजय जगदाळे म्हणाले काही नाही उद्याचे काय आहे कामाचे, त्यानंतर अभि.कथित लोकसेवक बनकर म्हणाले तुम्हाला किती वेळा म्हणलो हो म्हणुन, उद्या या सकाळी आकरा वाजता का आज येता तुम्ही टी.पॉईटला घेवुन त्यावर तक्रारदार श्री. अजय जगदाळे म्हणाले महयाकुण कमी घ्या, मी म्हणजे त्यानंतर अभि.कथित लोकसेवक बनकर म्हणाले कमीच घेतलेला, साडे पाचशे रुपये म्हणजे लय झाले का हो, शिक्का मारला तुमला [illegible] करुन दिलय तुम्हाला, तरी पण त्यावर तक्रारदार श्री. अजय जगदाळे, म्हणाले पन्नास फॉम चे हाई तें, त्यावर अभि. कथित लोकसेवक बनकर म्हणाले मग पन्नास फॉमचे ,साठ फॉम दिले मि तुम्हाला ,कळल का साठ फॉमचे साडे पाचशे रुपयांना किती पैसे होताता.कितीने दिले तुम्हाला साठ फॉम तुमचे हे मग आसे आहे चांगले काम करून दिले कि हे आसे आहे , उद्या आकरा वाजता या मग ते पैसे घेवुन त्यानंतर तक्रारदार श्री. अजय जगदाळे, म्हाणाले बरं बरं. त्यावर अभि.कथित लोकसेवक म्हणाले या मग उद्या आकरा वाजता ,असेल पैसे तर आताच आजच घेवुन या, त्यावर तक्रारदार श्री. अजय जगदाळे म्हणाले मग काही सकाळी देतो,अन काही सहया झाल्यावर देतो ना त्यावर अभि.कथित लोकसेवक बनकर म्हणाले तुम्हाला तेच सांगायाला लागलो ना मी ,कि सहया झाल्यावर कशाला त्यांच्या नावावर काही भरोवसा नाही काय ऐवढे फॉम दिले मी तुम्हाला, त्यानंतर तक्रारदार श्री. अजय जगदाळे म्हणाले बर, बर त्यावर अभि.कथित लोकसेवक म्हणाले काय राव हे आसे आहे तुमचे लोक माझाकडे एक एक लाख रुपये देवुन चाल्ले जातात अन तुम्ही हे असे त्या पोराने किती दिले ते पाहीले ना तुम्ही सत्तर हजार दिले त्यावर तक्रारदार श्री. अजय जगदाळे म्हणाले हाव त्यानंतर अभि.कथित लोकसेवक म्हणाले मग, उद्या याहो साडे आकरा वाजता बरोबर तुम्ही, साहेबांना सांगुन ठेवतो मी, त्यावर तक्रारदार श्री. अजय जगदाळे म्हणाले बरं बरं ,ठिक हे येतो, त्यानंतर अभि. कथित लोकसेवक बनकर म्हणाले ठेवुका मग, त्यावर तक्रारदार श्री. अजय जगदाळे म्हणाले हो, हो तक्रारदार श्री. अजय जगदाळे व अभि. कथित लोकसेवक श्री. बनकर यांच्यामध्ये बांधकाम कामगारास मागील वर्षात 90 दिवस किंवा अधिक दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र (फॉर्म) देण्या संदर्भाने संभाषण झालेले आहे. त्यामध्ये अभि. कथित लोकसेवक श्री. बनकर यांनी तक्रारदार यांचेकडील 50 बांधकाम कामगार यांचे बांधकाम कामगारास मागील वर्षात 90 दिवस किंवा अधिक दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र (फॉर्म) देण्यासाठी प्रत्यकी प्रमाणपत्र (फॉर्म) करीता 550/- (पाचशे पन्नास) रुपये प्रमाणे 50 प्रमाणपत्र (फॉर्म) करीता 27500/- (सत्तावीस हजार पाचशे) रुपये लाचेची मागणी करून प्रत्यकी प्रमाणपत्र (फॉर्म) करीता 550/- (पाचशे पन्नास) रुपये प्रमाणे 50 प्रमाणपत्र (फॉर्म) करीता 27500/- (सत्तावीस हजार पाचशे) रुपये लाचेची रक्कम स्वीकारण्यास संमती दिली असल्याचे निष्पण झाले असुन

त्याबाबतचा लाच मागणी पडताळणी पंचनामा दोन पंचा समक्ष दिंनाक 01/04/2026 रोजी करण्यात आला आहे. लाच मागणी पडताळणीमधील झालेल्या संभाषणामध्ये तक्रारदार व अभि.कथित लोकसेवक यांचेत लाचेची रक्कम ही दिंनाक 02/04/2026 रोजी देण्याचे ठरले असल्यामुळे अभि.कथित लोकसेवक यांचे विरुध्द लाचेचा सापळा दिंनाक 02/04/2026 रोजी आजमावण्याचा निणय आम्ही, दोन्ही पंच व तक्रारदार यांचे संमतीने घेतला. त्यानंतर पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्यांना गोपनियता बाळगण्याच्या सुचना देवुन दिंनाक 02/04/2026 रोजी सकाळी 10:00 वाजता लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर कार्यालय येथे हजर राहण्याबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर आम्ही दिंनाक 02/04/2026 रोजी तक्रारदार व दोन्ही पंचांना अभि. कथित लोकसेवक श्री. बनकर यांचे विरुद यांचेविरुध्द आज लाचेचा सापळा आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. अजय जगदाळे व पंचांना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी असले बाबत खात्री करुन दिली. नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. आम्ही त्यानंतर तक्रारदार यांना सापळा करवाईसाठी लागणारे 27,500/-रु हजर करण्याचे सांगितले तेव्हा त्यांनी 200/-रु दराच्या 100 चलनी नोटा व 500/- रु. दराच्या 15 चलनी नोटा आमच्या समक्ष हजार केल्या, सदर नोटांचे नंबर व वर्णन पंच क्रमांक-2 श्रीमती सारीका पायगव्हाण यांचे करवी नमुद करुन घेतले व त्यास पोअं/गोरे यांनी ऍथ्रासिन पावडर लावुन त्याच्या नोटा तक्रारदार श्री.अजय जगदाळे यांचे पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. आम्ही तक्रारदार यांना अभि.कथित लोकसेवक श्री. बनकर यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेल्या लाच रकमेच्या नोटा 27,500/-रु. काढुन अभि.कथित लोकसेवक श्री.बनकर यांना द्याव्यात व त्यानंतर आपल्या डोळ्यावरील चष्मा, काढून हातामध्ये घ्यावा असा इशारा नेमुन दिला. त्यानंतर तक्रारदार श्री.अजय जगदाळे, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवुन, अभि.कथित लोकसेवक श्री.बनकर यांनी लाच रक्कम स्विंकारल्यानतर तक्रारदार यांना त्यांचे डोळ्यावरील चष्मा हाता मध्ये घेण्याचा इशारा करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर सुरक्षीत ठिकाणाहुन पंचांसमक्ष सापळा कारवाईचे अनुषंगाने आमच्या आदेशाने पो.अ.बारसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये SanDisk कंपनीचे 16 जी.बी क्षमतेचे नवीन मेमरी कार्ड घालुन 11:24 वा. चालु करुन ते

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

ATUL SHIVDAS YERME(I (Inspector)) / ASYM8401

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

श्री.अजय जगदाळे, यांचे गळयात अडकवुन तक्रारदार श्री.अजय जगदाळे, पंच क्रं 1. श्री. शेख अतिक समी, यांना सापळा कारवाई कामी तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलने अभि.कथित लोकसेवक श्री.बनकर यांची भेट घेणे कामी झोन क्रमांक-6, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ मी सोबत पंच क्रं. 2 व सापळा पथक असे आमचेकडील शासकीय वाहन क्रमांक MH-20-EE-3983 या वाहनाने झोन क्रमांक-6, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर येथे आडोशाला जावुन तक्रारदार नजरेत राहील अशा रितीने थांबलो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं.1 हे अभि.कथित लोकसेवक श्री.रुपचंद बनकर यांची भेट घेण्यासाठी झोन क्रमांक-6, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर येथे गेले असता अभि. कथित लोकसेवक कार्यालयात मिळून न आल्याने तक्रारदार यांनी त्यांचे फोनवरुन अभि. कथित लोकसेवक यांचे फोनवर कॉल केला असता त्यांनी कॅननॉट प्लेस, फोनबुक दुकानाच्या परिसरात त्यानंतर तक्रारदार हे अभि.कथित लोकसेवक श्री.बनकर हे कॅननॉट प्लेस येथील फोनबुक दुकानाच्या परिसरात चर्चा करतांना दिसले. त्यानंतर अभि. कथित लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर तक्रारदार यांनी पथकास दिसेल अशा रितीने त्यांनी त्यांचे डोळ्यावरील चष्मा काढून हातामध्ये घेऊन अभि.कथीत लोकसेवक श्री.बनकर यांनी पैसे स्विकारल्याचा 11:39 वा नियोजीत इशारा केला. सदर इशारा समजुन आम्ही, पंच क्रं.2 व सापळा पथक सक्रीय होवुन आम्ही तक्रारदारास सोबत घेवुन अभि.कथित लोकसेवक बनकर, यांना कॅननॉट प्लेस, फोन बुक दुकानासमोर, छत्रपती संभाजीनगर परिसरातुन ताब्यात घेतले. त्यानंतर लागलीच तक्रारदार यांचे गळयातील व्हाईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर अभि.कथित लोकसेवक श्री.बनकर यांना 11:39 वा. ताब्यात घेऊन शासकीय वाहनामध्ये बसण्यात आले. त्यानंतर आम्ही सर्व सापळा पथक, तक्रारदार व पंच क्रं. 2 यांचे समक्ष पंच क्रं.1 यास सुरक्षीत ठिकाणावरुन निघाल्यापासुन ते नियोजीत इशारा होईपर्यंत काय घडले याबाबत विचारले असता, पंच क्रं.1 याने सांगीतले की, मी व तक्रारदार असे अभि.कथित लोकसेवक श्री.बनकर यांची झोन क्रमांक-6, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर कार्यालय, येथे भेट घेण्यासाठी गेलो असता, अभि.कथित लोकसेवक बनकर यांची भेट झाली नाही. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल फोन वरुन अभि.कथित लोकसेवक श्री. बनकर यांना फोन केला असता अभि. कथित लोकसेवक यांनी तक्रादार यांना कॅननॉट प्लेस येथे येणेबाबत सांगिले. त्यानंतर तक्रारदार श्री.अजय जगदाळे यांची व श्री.बनकर यांची भेट झाली त्यांचेमध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर अभि.कथित लोकसेवक श्री.बनकर यांनी पैशाबाबत विचारुन लाचेची रक्कम स्वता: स्विकारली. त्यांनी ती त्यांच्या हातामध्येच ठेवली. त्यानंतर तक्रारदाराने नियोजीत इशारा केला. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी देखील पंच क्र 1 यांनी दिलेल्या माहिती प्रमाणेच वरीलप्रमाणे हकीकत सांगीतली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉडर चालु करुन त्यामधील तक्रारदार, श्री. अजय जगदाळे आणि अभि.कथित लोकसेवक श्री.बनकर यांच्या दरम्यान झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार अजय जगदाळे **तुम्हाला हिसोब सांगतो ना,** म्हणाले अभि. कथित लोकसेवक म्हणाले **हे इकडे आहे तुम्हाला काल दिले ना साहेब असे नका करुना आता पुऱ्या याच्यावर सहया झाल्या ,आता तुमचे कीती फॉर्म आहेत** तक्रारदार म्हणाले **पन्नास हजाराचे किती होऊ राहीले मोजुन घ्या सत्ताविस हजार पाचसे रुपये आहेत.** अभि. कथित लोकसेवक म्हणाले **पाच हाजार दिले नाही ना हया मानसाने** असा तक्रारदार श्री.अजय जगदाळे व अभि.कथित लोकसेवक श्री.बनकर यांचे मध्ये झालेल्या संभाषणामध्ये आलोसे श्री.बनकर यांनी लाचमागणीची रक्कम स्विकारलेली आहे. यावरुन आलोसे श्री.बनकर यांनी तक्रारदार श्री.अजय जगदाळे, यांचे झोन क्रमांक-6, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर येथे 50 बांधकाम कामगारास मागील वर्षात 90 दिवस किंवा अधिक दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी झोन क्रमांक-6, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर कार्यालय येथील वरिष्ठांचा प्रभाव पाडुन आलोसे श्री.बनकर यांनी तक्रारदार श्री.अजय जगदाळे, यांचे कडुन लाचेची रक्कम 27,500/-रूपये स्वत: स्विकारल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही पंचासमक्ष शासकीय वाहनामध्ये बसवलेल्या इसमास त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव आलोसे श्री. रुपचंद धरमचंद बनकर, वय 47 वर्ष, व्यवसाय- नौकरी, पद- शिपाई पाणी पुरवठा वसुली विभाग, झोन क्रमांक-6, महानगरपालीका,छत्रपती

संभाजीनगर रा. मयुर पार्क, घर नं-26, वडाचे झाडाजवळ, सिध्दीधन सोसायटी, छत्रपती संभाजीनगर असे असल्याचे सांगीतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख करुन देवुन लाचेची रक्कम कोठे ठेवली याबाबत विचारले असता त्यांनी त्यांच्या उजव्या हातात असलेली रक्कम ही तक्रारदार यांचेकडून घेतल्याचे दिसून आले. तेव्हा सदरची लाचेची रक्कम पंच क्रं.2 यांचे मार्फतीने ताब्यात घेवुन सापळा पुर्व कारवाईवेळी तक्रारदार याचे कडे दिलेल्या नोटांच्या क्रमांकाची खात्री करता त्या त्याच क्रमांकाच्या नोटा असल्याचे दिसुन आले. तसेच पंचासमक्ष अल्ट्राव्हॉयलेट प्रकाशाचे उजेडात सदरच्या नोटा तपासल्या असता त्यावर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. सदरची लाचेची रक्कम, आरोपी श्री. रुपचंद बनकर यांनी त्यांचे उजव्या हातात ठेवल्या असल्याने त्यांचे दोन्ही हातावर अल्ट्राव्हॉयलेट प्रकाशाचे उजेडात पाहणी केली असता त्यांचे हातावर ठिक-ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यांनतर आलोसे श्री.रुपचंद बनकर यांचे कडुन लाचेची रक्कम 27,500/- रुपये व त्यांचे कडील मोबाईल ताब्यात घेतला तसेच तक्रारदार श्री.अजय जगदाळे यांनी सादर केलेले 50 बांधकाम कामगाराचे बांधकाम कामगारास मागील वर्षात 90 दिवस किंवा अधिक दिवस काम केल्याचे प्रमाणपत्राचे कोरे फॉर्म व बांधकाम कामगार यांचे आधारकार्ड
पंचासमक्ष अभि. कथित लोकसेवक श्री. बनकर यांचेकडून जप्त केले. तसेच आलोसे श्री. रुपचंद बनकर यांना ताब्यात घेवुन त्यानंतर पुढील कारवाईकामी ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे येवुन पंचनामा पुर्ण केला आहे.

तरी दि.02/04/2026 रोजी झोन क्रमांक-6, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर मागील बाजुस कॅनॉट प्लेस छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी यातील मुळ तक्रारदार श्रीं. अजय राजधर जगदाळे, वय 42 वर्ष, व्यवसाय महाराष्ट्र युवा शक्ती श्रमीक कामगार संघटना अध्यक्ष, व शेती, रा- सावंगी हर्सूल, ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांचेकडील 50 कामगार यांचे बांधकाम कामगारास मागील वर्षात 90 दिवस किंवा अधिक दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र तयार करुन देण्यासाठी आलोसे श्री. रुपचंद धरमचंद बनकर, वय 47 वर्ष, व्यवसाय-नौकरी, पद- शिपाई पाणी पुरवठा वसुली विभाग, झोन क्रमांक-6, महानगरपालीका,छत्रपती संभाजीनगर रा. मयुर पार्क, घर नं-26, वडाचे झाडाजवळ, सिध्दीधन सोसायटी, छत्रपती संभाजीनगर यांनी ते काम करत असलेल्या झोन क्रमांक-6, महानगरपालीका, छत्रपती संभाजीनगर कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथील वरिष्ठांचा प्रभाव पाडुन तक्रारदार श्री.अजय जगदाळे यांचे सदरचे काम करून देण्यासाठी प्रत्येक प्रमाणपत्राकरीता 550/-रू रूपये प्रमाणे एकुण 50 प्रमाणपत्राचे 27,500/- रुपये लाचेची मागणी केली आहे. दिनांक 01/04/2026 रोजी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक 02/04/2026 रोजी लाचमागणी पडताळणी केली असता यातील आरोपी श्री. रुपचंद बनकर यांनी तक्रारदार यांचेकडील बांधकाम कामगार यांचे बांधकाम कामगारास मागील वर्षात 90 दिवस किंवा अधिक दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र तयार करुन देण्यासाठी प्रत्येक प्रमाणपत्राकरीता 550/-रू रूपये प्रमाणे एकुण 50 प्रमाणपत्राचे 27,500/- रुपये लाचमागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लागलीच सापळा कारवाई दरम्यान कॅनॉट प्लेस परिसरात फोनबुक दुकानासमोर, छत्रपती संभाजीनगर येथे सदरची लाच रक्कम आलोसे श्री. रुपचंद धरमचंद बनकर, वय 47 वर्ष, व्यवसाय-नौकरी, पद- शिपाई पाणी पुरवठा वसुली विभाग, झोन क्रमांक-6, महानगरपालीका,छत्रपती संभाजीनगर रा. मयुर पार्क, घर नं-26, वडाचे झाडाजवळ, सिध्दीधन सोसायटी, छत्रपती संभाजीनगर यांनी स्वत: स्विकारली आहे. सबब आरोपी आलोसे श्री. रुपचंद धरमचंद बनकर, वय 47 वर्ष, व्यवसाय- नौकरी, पद- शिपाई पाणी पुरवठा वसुली विभाग, झोन क्रमांक-6, महानगरपालीका,छत्रपती संभाजीनगर रा. मयुर पार्क, घर नं-26, वडाचे झाडाजवळ, सिध्दीधन सोसायटी, छत्रपती संभाजीनगर यांनी ते काम करत असलेल्या कार्यालयातील वरिष्ठांचा प्रभाव पाडुन तक्रारदाराचे काम करून देतो म्हणुन लाचेची रक्कम स्वीकारली म्हणुन त्यांच्या विरोधात माझी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकार तर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा फिर्यादी जबाब मी संगणकावर टंकलिखीत केलेला असुन, तो मी वाचुन पाहीला असता बरोबर व खरा आहे.

फिर्याद दिली सही.

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के क.रण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-यांची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ATUL SHIVDAS YERM

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): ASYM8401